# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१८८/११०
ईमेल: secretary@msbte.com संकेतस्थळ : www.msbte.org.in

जा. क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F१/२०२२/ ०२४ दिनांक – - 3 MAR 2022

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्नित सर्व संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सम सत्र अभ्यासक्रमातील घटक चाचणी परीक्षेबाबत...**

संदर्भ : १) मंडळाचे समसत्र करीताचे शैक्षणिक वेळापत्रक क्र. MSBTE/D-40/Even Sem/Academic Calendar/ 2021/007, Dt. 22/01/2022
२) मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-५०/सत्रकर्म/२०२२/७६६, दि. २८/०१/२०२२
३) महाराष्ट्र शासन उच्च तंत्र शिक्षण विभागाचे परीपत्रक क्र. संकीर्ण २०२१/प्र. क्र. ६/वि शि ३, दि. २५/०१/२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सम सत्र अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वेळापत्रक मंडळाने घोषित केले आहे. तसेच संदर्भ क्र. २ परीपत्रकानुसार मंडळाशी संलग्नित संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ग प्रत्यक्षरित्या सुरु करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ३ मधील महाराष्ट्र शासन उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या परीपत्रकाद्वारे विद्यापीठे/ महाविद्यालयाच्या दि. १५/०२/२०२२ पर्यंत घेण्यात येणा-या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात याव्यात व तदनंतर घेण्यात येणा-या परीक्षा ऑफलाईन/ ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे सूचित केले आहे.

त्यानुसार उपरोक्त विषायाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सम सत्र अभ्यासक्रमातील सर्व अभ्यासक्रमाच्या यापुढील प्रथम / द्वितीय/ तृतीय घटक चाचणी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने संदर्भ क्र. १ मध्ये नमूद वेळापत्रकानुसार मंडळाच्या मानकानुसार घेण्यात याव्यात.

सदर घटक चाचणी परीक्षा घेतांना राज्यातील मंडळाशी संलग्नित संस्थांमध्ये कोव्हीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश, कामाच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निर्देश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्यप्रणाली (एसओपी) तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत –
१) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.
२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता